# **Possitive Stories**

गडचिरोली दि. २७/०५/२०१७

## *पोलीसांनी केला करकेवाडा येथील नक्षल कॅम्प उध्वस्त*

- ***मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त***

गोपनिय माहितीच्या आधारे आज दिनांक २७/०५/२०१७ रोजी महाराष्ट्र - छत्तीसगड सीमेवरील करकेवाडा जंगल परिसरात, उपविभाग भामरागड, विशेष अभियान पथक नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना नक्षल कॅम्प उध्वस्त करण्यात पोलीसांना यश आले. आज सकाळी ०८.३० वा. च्या दरम्यान करकेवाडा येथे पोलीस-नक्षल चकमक झाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी आपल्या जवळील साहित्य घटनास्थळीच टाकून जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

दरम्यान चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पोलीसांनी घटनास्थळावरुन मेडीकल साहीत्य, दररोज वापराचे साहीत्य तसेच लिखीत साहीत्य असे मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त केले आहे.

सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.

